## न्यायमूर्ती पी. बी. सावंत

न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली,
दि. २२ डिसेंबर, १९९०

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.पवार, विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे आणि विधिसभेचे सदस्य, इतर प्रतिष्ठित निमंत्रित मंडळी आणि माझ्या तरूण मित्रांनो,

आजचा हा पदवीदान समारंभ अशावर्षी होत आहे की, ज्यावर्षी समाजाला शिक्षणाचा मूलमंत्र देणाऱ्या महात्म्याच्या पुण्यतिथीची शताब्दी साजरी होत आहे आणि महात्मा फुले झाले नसते तर मी झालो नसतो अशी जाहीर सामाजिक ऋणाची ग्वाही देणारे डॉ.आंबेडकर आणि फुल्यांना आपल्या गुरूस्थानी मानणारे डॉ.आंबेडकर यांच्या जन्मतिथीची शताब्दी होत आहे. ज्या भूमीत हा समारंभ घडून येत आहे त्या भूमीत फुल्यांनी दिलेल्या शिक्षण प्रसाराच्या मंत्राचा जागरूकतेने प्रसार करणारे आणि जात, धर्म, पंथ असा कुठलाही भेदभाव न बाळगता बहुजनहिताय, बहुजनसुखाय असा राज्यकारभार करून दाखविणारे राजर्षी शाहू यांची ही भूमी. इथे हे जे विद्यापीठ निर्माण झालेले आहे हे विद्यापीठ केवळ इथल्या भौगोलिक गरजेसाठी किंवा सोयीसाठी निर्माण झालेले नाही. या विद्यापीठाच्या परिसरामध्ये ज्या अनेक शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या, त्या शैक्षणिक संस्थांचे नियमन करण्यासाठी, त्यांचा संसार चालविण्यासाठी हे विद्यापीठ निर्माण झाले आहे. आणि या शेकडो शैक्षणिक संस्था निर्माण करणाऱ्यांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांच्या कार्यापासून स्फूर्ती घेणारे अनेक कार्यकर्ते यांचा सिंहाचा वाटा आहे. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी तर खास दलितवर्गासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशन काढून, त्या वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार केला. स्वत: तिथे कुटुंबासह राहून, त्यांची त्यांनी सेवा केली. यासर्व थोर पुरूषांचे स्मरण आपण आज या प्रसंगी केले पाहिजे. कारण, ही द्रष्टी कर्मयोगी मंडळी जर झाली नसती तर या सभा मंडपामध्ये जे अनेक लोक आज आपल्याला निरनिराळ्या नात्यांनी उपस्थित आहेत, ते तसे दिसले नसते. याची जाणीव थोरांनाच तर नाही, मग ती आजच्या तरूण वर्गालाही ती असणे अस्वाभाविक आहे. अनेकवेळा जेव्हा आम्ही तरूण मनाचा त्याप्रमाणे थोरांच्या मनाचा कानोसा घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा हा पूर्वोतिहास, पूर्वोतिहासाची यांना जाणीव आहे असे दिसत नाही. याचे कारण अर्थातच आम्हांला जो सामाजिक, राजकीय इतिहास शिकविण्यात येतो, आला आहे, हे तर आहेत. परंतु, आम्ही शिक्षित होऊनही अशिक्षित राहिलो आहोत, हेही तितकेच महत्त्वाचे कारण आहे. अनेकजणांना असे वाटते की, शैक्षणिक संस्थातून आपण जे ज्ञान घेतो, ते ज्ञान हे त्या त्या विषयातले संपूर्ण ज्ञान आहे. आणि म्हणून एकदा परीक्षा संपली, पदवी पदरात पडली की, त्या विषयाचा अभ्यास परीक्षेबरोबरच संपतो. हा गैरसमज सर्वत्र

आहे. परंतु, तो तितकाच अक्षम्य आहे. ज्ञान हे असीम आणि जसजसा काळ लोटतो, तसतसा त्या ज्ञानाच्या कक्षा, त्या ज्ञानाची खोली ही वाढत जाते. अनेक कारणांमुळे ज्ञान संपादनाची जी साधने असतात, ती सुधारतात. नवीन निर्माण होतात. नवीन माहिती उपलब्ध होते. नवीन प्रयोग होतात, नवीन सिद्धांत मांडले जातात. प्रत्येक क्षेत्रातले ज्ञान हे काळाबरोबर वाढत असते. गणितापासून संगीतापर्यंतच्या सर्व क्षेत्रात ही प्रक्रिया चालू असते. आपणाला शिक्षणसंस्थांमध्ये जे शिक्षण मिळते ते शिक्षण हे फक्त त्या ज्ञानाची झलक असते. बाजू असते. जास्तीत जास्त एखादा कोपरा असतो. हे शिक्षण म्हणजे त्या विषयातल्या ज्ञानभांडाराची किल्ली असते. ती किल्ली घेऊन ते ज्ञानभांडार आपणाला उघडायचे असते. खरा ज्ञानार्जनाचा प्रवास हा शैक्षणिक संस्थांतून बाहेर पडल्यानंतरच सुरू होत असतो. आज तुम्हाला ज्या पदव्या मिळालेल्या आहेत, त्या पदव्यांचा अर्थ इतकाच आहे की, तुम्ही या पुढच्या ज्ञानाचा प्रवास करायला समर्थ झाला आहेत. आणि हा प्रवास कधीही न संपणारा आहे. परंतु, मी मघा म्हटल्याप्रमाणे काही लोक परीक्षेबरोबरच त्या त्या विषयातला अभ्यास, त्या त्या विषयातले ज्ञानार्जन हे संपवत असतात आणि म्हणून ते आयुष्यात संपतात. जीवनाच्या लढ्यामध्ये ते मागे पडतात. आपणाला असे अनेकवेळा दिसून येते की, शैक्षणिक जीवनामध्ये जे फारसे चमकले नाहीत, ते आयुष्याच्या जीवनलढ्यामध्ये मात्र पुढे असतात. या विरूद्ध शैक्षणिक क्षेत्रात जे चमकले, परीक्षेत उत्तम क्रमांक घेऊन पास झाले ते आयुष्याच्या लढ्यामध्ये मागे पडलेले दिसतात. याचा अर्थ एवढाच आहे की, आपण परीक्षेत उत्तीर्ण होतो म्हणजे जीवनाच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होत नाही. त्याच्याकरीता निराळा लढा द्यावा लागतो आणि विशेष म्हणजे त्या त्या विषयामध्ये, मग आपला कुठलाही विषय असो, आपल्या व्यवसाय कुठलाही असो, आपला धंदा कुठलाही असो त्या त्या उद्योगातून त्या त्या व्यवसायातून शिक्षण, ज्ञान यांच्याबाबतीत आपण अद्यावत राहण्याचा प्रयत्न करतो, दुसरा आपले ज्ञानार्जनाचे कार्य तिथेच थांबवतो आणि म्हणून तो जरी शैक्षणिक आयुष्यात चमकला तरी जीवनाच्या आयुष्यात मागे पडतो. तुम्ही असे म्हणालं की, आयुष्याच्या शिडीमध्ये, जीवनाच्या शिडीमध्ये वरच्या पायरीवर आज जी काही मंडळी आहेत ती आपल्या ज्ञानामुळे आणि गुणामुळे आहेत असे नाही. ही वस्तुस्थिती आहे. परंतु ही वस्तुस्थिती सर्व समाजामध्ये सर्व काळामध्ये अपवादात्मक दृष्ट्या नेहमीच दिसून आलेली आहे, घडून आलेली आहे. परंतु अशा घटना जेव्हा सर्रास घडतांत तेव्हा तो समाज आतून आणि बाहेरून सडलेला आहे, किडलेला आहे असे मानायला हरकत नाही आणि त्या समाजाचा नाश हा अटळ आहे, हा फक्त वेळेचा प्रश्न असतो. मी जे आपल्याला सांगतो आहे ते अशा रोगट समाजाबद्दल सांगत नाही म्हणून आपण एक प्रतिज्ञा या प्रसंगी केली पाहिजे ती ही मी शेवटपर्यंत विद्यार्थी राहणार आणि माझे विद्यार्थी जीवन हे माझ्याबरोबरच संपेल. तुम्ही आयुष्यामध्ये काही आडमार्गाने, आडवळणाने जाऊन

जर प्रयत्न करणार असला तर तुम्हीही समाजाला कीड लावणार आहात हे लक्षात घ्या आणि त्यामुळे समाजाचा नाश ओढवणार आहात. आपले कार्य ही कीड त्या कीडीचा बिमोड करणारे आहे, आपले कार्य कीटकनाशकाचे आहे त्या कीटकापैकी एक कीटक होण्याची नाही. हे जर आपण लक्षात ठेवलेत तर आयुष्याच्या शेवटी कधीही पश्चाताप करण्याची पाळी येणार नाही. केवळ माहिती म्हणजे ज्ञान नाही किंवा त्या त्या विषयातली विद्या नाही, हे ही आपण लक्षात ठेवायला पाहिजे. माहितगार हा ज्ञानी नाही, विद्यावंत नाही, परंतु जी जी माहिती आपल्याला मिळते मग ती शैक्षणिक संस्थातून मिळत असो, बाहेरच्या जगातून मिळत असो, प्रसार माध्यमातून मिळत असो, किंवा कुठल्या ग्रंथातून मिळत असो, हा ग्रंथ कितीही आदरणीय असो ज्या व्यक्तींनी तो लिहिला आहे ती व्यक्ती कितीही प्रतिष्ठित असो, आदरणीय असो, विद्वान असो, परंतु जो पर्यंत ही माहिती आपण आपल्या स्वतंत्र बुद्धीने तपासून घेत नाही तो पर्यंत त्याला ज्ञानाच्या संज्ञेची पात्रता येत नाही. शिक्षणाचा एक मुख्य उद्देश असा असतो, की माणसाला डोळस करावे. सत्य–असत्य–अर्धसत्य, चांगले–वाईट–यांच्यामध्ये चिरफाड करायला शिकवणे. परंतु दुर्दैवाने आज ही परिस्थिती आहे की समाजातील शेकडा ९९.९९% लोक ही मिळालेली माहिती मग ती कोठूनही असो ती जशीच्या तशी ग्रहण करीत असतात. त्यामुळे समाजाची प्रगती होत नसते. खरे पाहता या सर्वांवर जो शिक्षणाचा खर्च होतो समाज शिक्षणाकरिता जे कष्ट घेतो तो खर्च आणि कष्ट हे वाया गेलेले असतात. कारण या महाभागामध्ये आणि अशिक्षितांमध्ये काहीही फरक राहत नाही. फरक एवढाच की एक अशिक्षित आणि तो दुसऱ्यांच्या विचाराने अशिक्षित म्हणून चालत असतो आणि दुसरा शिक्षित होऊनही दुसऱ्यांच्याच विचारांचा गुलाम असतो. म्हणून समाज हा जिथे आहे तिथेच राहत असतो. आपण एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे ती ही की मानवाचे जे आजपर्यंत अश्मयुगापासून ते अणुयुगापर्यंत आणि आजतर संगणक युगापर्यंत जी प्रगती केलेली आहे ती प्रगती, परंपरेने चालत आलेले विचार, सिद्धांत, प्रमेये, निष्कर्ष हे शिरोधार्य मानणाऱ्या, बाबा वाक्यम् प्रमाणम् या नियमाला धरून चालणाऱ्या बहुसंख्य लोकांमुळे नाही, तर समाजातील जे महाभाग प्रत्येक पारंपारिक विचाराला, सिद्धांताला धक्के देऊ शकले, स्वतंत्र प्रज्ञेने ज्यांनी त्यांचा विचार दिला, नवीन सिद्धांत निर्माण केले, नवीन निष्कर्ष काढले, आपल्या बुद्धीच्या ऐरणीवर सर्व काही विचार माहिती तपासून घेतली, त्यांच्या प्रयत्नामुळे आपण आज या स्थितीला आलेले आहोत. नाहीतर आम्ही आजही रानटी अवस्थेत राहिलो असतो. म्हणून एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात ठेवायला पाहिजे ती ही की प्रथमतः आपण आपली या बौद्धिक गुलामगिरीतून वैचारिक पारतंत्र्यातून स्वतःची सुटका करून घेतली पाहिजे. अन्यथा तुम्ही स्वतःचीही प्रगती करू शकणार नाही आणि समाजाचीही प्रगती करू शकणार नाही. बौद्धिक गुलामगिरी ही सर्व गुलामगिरीचे मुळ आहे आणि सर्व गुलामगिरीत बौद्धिक गुलामगिरीचे ही

अत्यंत धोकादायक आणि तशीच ती सर्वंकष असते. एकवेळ राजकीय गुलामगिरी, आर्थिक गुलामगिरी, सामाजिक गुलामगिरी ही तुम्हाला दिसते , भासते, जाणवते. परंतु जे दुसऱ्याच्याच विचाराने नेहमी चालत असतात तशी त्यांना सवय झालेली असते त्यांना आपण बौद्धिक गुलाम झालो आहोत याची जाणीव नसते. कारण मनाची सवय असते, प्रवृत्ती असते आणि सवयी एकदा जडल्या की त्या लवकर नाहीशा होत नाहीत आणि बौद्धिक गुलामगिरीची सवय तर केव्हाही नाहीशी होत नाही कारण या गुलामाला आपल्याला ही सवय जडलेली आहे याचीही जाणीव नसते. म्हणून लवकरात लवकर स्वतंत्रपणे विचार करायला शिकणे, बौद्धिक गुलामगिरीतून आपली मुक्तता करणे हे आवश्यक आहे. हे ओळखून शिक्षण प्रसाराच्या कार्याबरोबरच महात्मा फुल्यांनी सत्यशोधनाच्या चळवळीची सुरुवात केली हे आपण लक्षात ठेवायला पाहिजे. आज आपल्याला सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झालेला दिसून येत आहे. खेडोपाडी नाही म्हणता या परिसरात शाळा निर्माण झाल्या आहेत, तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालयेही निर्माण झालेली आहेत. या शाळेत देण्यात येणाऱ्या शिक्षणाची प्रत, तिचा दर्जा याबद्दल मी आज बोलत नाही, तो स्वतंत्र विषय आहे. परंतु प्रसार झालेला आहे. खेडोपाडी लोक शिकतात असे आपण समजू या. परंतु तितक्याच पटीने सत्यशोधन चळवळीची पिछेहाट झालेली आहे, ती थंडावली आहे. यामुळे ज्या विचारांविरुद्ध ज्या प्रवृत्तीविरुद्ध  ज्या दोषा विरूद्ध आघाडी उघडण्याकरिता ते नाहीसे करण्याकरिता फुल्यांसारख्या महात्म्यांनी शिक्षणाचा मूलमंत्र दिला त्या मूलमंत्राचा हेतूच आज पराभूत होत आहे हे आपल्याला सर्वत्र दिसून येत आहे. कारण फक्त शैक्षणिक संस्था निर्माण करून भागत नाही. या शिक्षणसंस्थांमध्ये जे शिक्षण दिले जाते त्याचा आशय काय आहे हे तपासणे, ते पाहणे, त्याबाबत काळजी घेणे हे फार महत्त्वाचे आहे. जर प्राथमिक शाळापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत आज पूर्वीचे सनातनी विचार आपल्या पुढे मांडण्यात येत असतील, विद्यार्थ्यांना शिकविण्यात येत असतील तर शिक्षणप्रसाराचा अर्थ सनातनी विचारांचा प्रसार एवढाच होऊ शकतो. आपण जर या शाळांतून, कॉलेजातून विद्यापीठातून सनातन्यांची फौज जर निर्माण करणार असून तर समाजावर फार मोठं अरिष्ट येणार आहे आणि आज ते आलेले आपल्याला दिसत आहे. या रुढी, ज्या अंधश्रद्धा, जे विचार समाजाला घातक आहेत ते नाहीसे करण्याकरिता फुल्यांसारख्या  समाजक्रांतीकारकांनी लढा उभारला. आज त्यांचाच पगडा समाजावर सर्वत्र आपल्याला दिसत आहे आणि तोही शिक्षित समजल्या जाणाऱ्या समाजामध्ये, विशेषत: तरूणवर्गामध्ये आणि या विचारांचे पोषण करण्याकरिता, त्यांची जोपासना करण्याकरिता, ते रुजविण्याकरिता आज सर्वात पुढे कोण असेल तर आमचा विद्यार्थीवर्ग आणि शिक्षितवर्ग. हे जे चित्र आपल्याला दिसत आहे याचे कारण आम्ही शिक्षणाचा आशय तपासलेला नाही. या शिक्षणातून आम्ही या सनातनी विचाराचे लोक तयार

करीत आहोत. म्हणूनच पुन्हा सत्यशोधनाची चळवळ पराभूत झालेली नाहीतर आपण पुन्हा पूर्वीच्याच ठिकाणी जाऊन पोहोचत आहोत आणि आज तर अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे, की जी फुल्यांच्या काळी ही परिस्थिती निर्माण नव्हती. समाजाचे सर्व अंग, उपांग, या विचाराच्या माणसांनी भरून गेलेले आहे. आणि तिथला कारभार या अशा विचारांनी चाललेला आहे. हे समाजावर फार मोठे अरिष्ट आलेले आहे. दुर्दैवाने याकडे समाजातल्या जबाबदार व्यक्तींचे कुठल्याही प्रकारे लक्ष नाही. ही गोष्ट आपण खेदाने नमूद केली पाहिजे. आणि शिवाजी विद्यापीठातल्या लोकांनी तरी यामध्ये लक्ष घालून या शिक्षणाचा आशय तर आपला चुकलेला नाही ना, हे तपासून घेण्याची काळजी घेतली पाहिजे. दुसराही एक प्रकार होता, ज्ञानाचा उपयोग आपण विधायक कार्यासाठी करू शकतो, विघातक कार्यासाठी करू शकतो. समाजामध्ये सत्प्रवृत्ती वाढविण्याकरिता त्याचप्रमाणे समाजाला पिळण्याकरिता, नाडण्याकरिता, तेथे भ्रष्टाचार माजविण्याकरिताही आपण करू शकतो. आमच्या वैज्ञानिक मंडळींनी मानवाला त्याचे आयुष्य सुखद व्हावे, सुलभ व्हावे म्हणून अनेक उपयुक्त शोध काढलेले अऋहेत, उपकरणे काढलेली आहेत आणि नाही म्हणता विज्ञानामुळे माणसाचे आयुष्य सुलभ झालेले आहे, सुखद झालेले आहे. परंतु त्याचबरोबर याच वैज्ञानिक मंडळीपैकी काही मंडळींनी ॲटमबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब निर्माण केला आहे. कोबाल्ट बॉम्ब निर्माण केला अहे, रासायानिक अस्त्रे निर्माण केलेली आहेत. आणि असे तंत्रज्ञान निर्माण केलेले आहे की ज्यामुळे प्रदुषण होत आहे, पर्यावरणाचा तोल जात आहे. हे या वैज्ञानिक मंडळींनी केलेले आहे, हे आपल्याला दिसून येते. त्याचप्रमाणे आपल्याला जे ज्ञान मिळालेले आहे त्या ज्ञानाचा उपयोग समाजाला किती नाना प्रकारे मिळवता येईल, नाडता येईल याकडेही करण्यामध्ये अनेक लोक गुंतलेले आहेत. कायदे कसे मोडावेत, कर कसे चुकवावेत. काळाबाजार कसा करावा, चाचेगिरी कशी करावी, ठराव कसे पास करावेत, संस्थेचा पैसा स्वत:कडे कसा आणावा या गोष्टीमध्येही आपली बुद्धी आज गुंतलेली आहे. म्हणजे बुद्धीचा उपयोग आम्हाला दोन्ही प्रकारे करता येतो. हे का घडत आहे याचाही आपण शोध घ्यायला पाहिजे आणि त्याचे कारण जर आपण शोधायला गेलो तर त्याचे प्रमुख कारण आपल्याला असे दिसेल की आजचे आमचे जे शिक्षण झाले आहे, जो अभ्यासक्रम आहे त्या अभ्यासक्रमाचा आणि शिक्षणाचा, संस्कारांचा आणि संस्कृतीचा काहीही संबंध नाही. शिकविणाऱ्यालाही माहिती असते, शिकणाऱ्यालाही माहिती असते. की मी इथे फक्त एक नोकरदार होण्याकरिता, कारखानदार होण्याकरिता, व्यापारी होण्याकरिता किंवा कुठलाही व्यावसायिक होण्याकरिता शिक्षण घेतो आहे. शिक्षकही त्याच हेतूने ते देत असतो. शिक्षणक्रमामध्ये विद्यार्थ्याला एक उत्तम नागरिक करणे किंवा मानव जातीचा एक उत्तम घटक करणे असा अभ्यासक्रम किंवा शिक्षणक्रम आपल्याला कुठे दिसत नाही. म्हणजे संस्काराची आणि

शिक्षणाची फारकत झालेली आहे. मूल्ये मूल्ये जी काही म्हणता, त्या बाबतीत विद्यार्थी जगतामध्ये संपूर्ण अज्ञान आहे. परंतु, अनेकवेळा शिक्षकांमध्येही ते अज्ञान दिसून येते. हे खेदाने नमूद करायला पाहिजे. मी या विषयावर अधिक बोलत नाही. मी हा विषय इतकाच इथे थांबवितो आणि एवढेच सांगतो की, सामाजिक, राजकीय, मानवजातीची मूल्ये असा शिक्षणक्रम आखल्याशिवाय आम्ही नवा माणूस तयार करू शकणार नाही आणि आज तो सर्वत्र आम्हाला हिंसाचार, असहिष्णुता, भ्रष्टाचार दिसत आहे हा असाच राहणार. आज कॉलेजमधल्या प्रकरणापासून तिथे होणाऱ्या निरनिराळ्या निवडणुकांमध्ये जो भ्रष्टाचार होतो, त्या प्रकरणापासून तर आज ठिकठिकाणी निरनिराळ्या कारणाकरता जे उद्रेक होतात, त्या उद्रेकांमध्ये आमचा विद्यार्थीवर्ग, आमचा तरूणवर्ग सामील होतो. सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करतो आणि गुंडाचे विचार आणि गुंडांची कृती यांच्यामध्ये व त्यांच्या कृतीमध्ये, त्यांच्या विचारामध्ये काही फरक राहत नाही हे जेव्हा दृष्य आपण पाहतो, त्यावेळी मग आपण कुठल्या पद्धतीने या विद्यार्थ्याला शिक्षण दिले, याच्या मुळाकडे जाऊन विचार करायला सुरूवात करतो. आणि मग आपल्याला हे असे दिसते की, आपले शिक्षण कुठेतरी चुकले आहे. कारण त्यांच्यावर संस्कार होत नाहीत. इथे संस्कृती निर्माण होणार नाही. मला आश्चर्य वाटते की, शिक्षण घेऊनसुद्धा विद्यार्थी जेव्हा सरकारी मालमत्तेचा किंवा सार्वजनिक मालमत्तेचा विद्ध्वंस करतात, तेव्हा त्यांना एवढेही कळत नाही की, सर्व मालमत्ता ही आपली आहे. सरकारची मालमत्ता म्हणजे ही कुठल्या मंत्र्याची किंवा संत्र्याची मालमत्ता नाही. त्यांचे पगार, भत्ते मिळत असतात. त्यांना शेवटी हे नुकसान आपल्या पैशातून भरून येणार आहे. आपल्याला सारा भुर्दंड द्यावा लागणार आहे. एवढी साधी कल्पनासुद्धा आमच्या विद्यार्थी वर्गाला नसते. कारण चुकीचे विचार आणि त्या तारूण्यातला उत्साह या दोघांचा मिलाप झाल्यानंतर माती जिरायला वेळ लागत नाही आणि मग ती खाजगी मालमत्ता, सार्वजनिक मालमत्ता असा भेदाभेद त्यांच्यापुढे दिसत नाही. आणि आज ज्या विध्वंसक चळवळी होत आहेत, त्यामध्ये जो आम्हाला तरूणवर्ग दिसत आहे, त्याचे कारण हे आहे हे आपल्याला दिसून येते. आज दुसरा एक प्रकार होत आहे, हा समाजाला आणि देशाला अधिक घातक आहे हे आपण लक्षात घ्या. हा प्रकार काय आहे की, आम्हाला जे ज्ञान मिळाले आहे, आमच्या जवळ जी बुद्धी आहे, ही बुद्धी हे ज्ञान आम्ही समतोल पद्धतीने वापरायचे असते. परंतु, आम्ही आमची बुद्धी वक्र गतीने वापरत असतो. आमच्यावर जे पूर्वग्रह झालेले असतात, पूर्वी आमच्यावर जे संस्कार झालेले असतात, त्यांच्यातून आमची जी मते निर्माण झालेले असतात, ज्या आवडी–निवडी निर्माण झालेल्या असतात, त्या आवडी–निवडीच्या कलाने ज्ञानार्जन करण्याचा प्रयत्न करतो. माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करतो. आणि मग इतिहासाच्या नावाखाली कादंबऱ्या

आणि संशोधनाच्या नावाखाली ऐतिहासिक घटनांचे विकृतीकरण आणि ऐतिहासिक व्यक्तींचे चारित्र्यहनन करणारी चोपडी बाजारात येऊ लागलेली आहे. यामुळे समाजाचे स्वास्थ्य बिघडत आहे. समाजाचे विघटन होत आहे. हे का होत आहे हेही आपण समजून घेतले पाहिजे. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे, त्याचा अर्थ एवढाच आहे की, आमच्या संस्कारक्षम वयामध्ये म्हणजे बालपणामध्ये जे संस्कार होतात ते संस्कार आम्ही पुढे प्रौढ झालो तरी आमची मते, विचार, तत्त्वज्ञान हे घडवत असतात. आपण मानवतावादी, साम्यवादी, समाजवादी वगैरे वगैरे हे सज्ञान झाल्यानंतर होत असतो. परंतु, तत्पूर्वी आपण हिंदू असतो, मुस्लिम असतो, मराठा असतो, ब्राह्मण असतो, दलित असतो आणि हे जे संस्कार आमच्या बालपणी झालेले असतात, यामुळेच कळत–नकळत प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे आपली मते पुढे बनली जातात. याबाबतीत पंडित जवाहरलाल नेहरूंनी एकदा उद्गार काढले. ते माझ्या अजूनही स्मरणात आहेत. त्यांचे म्हणणे असे की, माणूस ज्यावेळी व्यासपीठावरून बोलतो, त्यावेळी तो मुखवटे धारण करून बोलतो. परंतु, तो ज्यावेळी कुठल्या तरी नैमित्तिक प्रसंगाने त्याला कॅज्युअल असे इंग्रजीत म्हणतात बोलतो त्यावेळी त्याचे खरे अंतरंग समजून येते. म्हणून ज्ञानार्जन , ज्ञानदान करताना आपण आले पूर्वग्रह हे बाजूला ठेवले पाहिजेत. कारण हे पूर्वग्रह घेऊन आम्ही जेव्हा ज्ञानार्जन करतो, त्यावेळी फक्त त्या विचाराला पुष्टी देणारे ज्ञान, माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करतो आणि ते एकत्र आणतो आणि त्याला आम्ही संशोधन म्हणतो. इतिहास म्हणतो. हे व्हायचे नसेल तर प्रथमत: आपण स्वत:ची स्वत:कडून सुटका करून घेतली पाहिजे. अंर्तमनापासून स्वातंत्र्य मिळवले पाहिजे. खऱ्या अर्थाने आपण मुक्तात्मा झाले पाहिजे. तरच आपण समाजाला उपयोगी असे ज्ञान गोळा करू शकू, ज्ञान देऊ शकू. त्यामुळे प्रगती साधू शकू. अथवा समाजस्वास्थ्य बिघडवणे, देशाचे विघटन करणे एवढेच महाकाय आपल्या हातून होणार आहे. तेव्हा शिकलेल्या माणसांना, पदवीधारकांना माझी विनंती आहे की, आपण ज्या ज्या क्षेत्रामध्ये हे ज्ञानार्जन करणार आहात किंवा ज्ञानदान करणार आहात, काही ग्रंथ लिहिणार आहात, काही शिक्षकाचा पेशा स्वीकारणार आहात, त्यावेळी या गोष्टींचे भान राहू द्या. समाजाचे खरे हित जर तुम्हाला साधायचे असेल, तर प्रथमत: आपण आपले सर्व पूर्वग्रह दूर करून ज्ञानार्जन करा, ज्ञानदान करा. आज आपण शिवाजी विद्यापीठाचा जो प्रगतीचा अहवाल ऐकला. विशेषत: गेल्या वर्षातला, त्यावरून असे दिसून येते की, हे विद्यापीठ अनेक क्षेत्रामध्ये गेल्या २७ वर्षामध्ये पुढे चाललेले आहे. याचे भवितव्यही फार मोठे आहे. अनेक संस्था, शैक्षणिक संस्था परिसरात निर्माण होणार आहेत. गेल्याच वर्षामध्ये २६ महाविद्यालयांना परवानगी मिळाली आहे, असे त्यांना सांगितले आहे. ती संख्या दिवसेंदिवस वाढणार आहे. विद्यापीठाच्या शाखाही वाढणार आहेत. भवितव्य फार मोठे आहे. कोणत्याही शैक्षणिक

संस्थेचे यश हे त्या शैक्षणिक संस्थेचे नेतृत्व करणारी मंडळी, तिथले शिक्षक, तिथले विद्यार्थी आणि तिथले सर्व पातळीवरील कर्मचारी यांच्या सर्व सहकार्याचे मिळून असे झालेले असते. आणि ते यश उत्तरोत्तर या विद्यापीठाला मिळत राहिले ते मिळत रहावे अशी मी सदिच्छा यावेळी प्रगट करतो. परंतु, माझी या विद्यापीठाकडून आणि या विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांकडून एक दुसरी फार मोठी अपेक्षा आहे की, इथल्या परिसराचा सामाजिक इतिहास लक्षात घेता, ज्या पार्श्वभूमीवर हे विद्यापीठ निर्माण झाले आहे ती पार्श्वभूमी लक्षात घेता, आपण फक्त ज्ञानार्जनाचे आणि ज्ञानदानाचे काम करता कामा नये. इथं एक गोष्ट निश्चित आहे की, या देशामध्ये समाजक्रांती व्हायची असेल तर प्रथमत: वैचारिक क्रांती व्हायला पाहिजे आणि या वैचारिक क्रांतीचे पाईक म्हणून तुम्ही पुढे आले पाहिजे. तसेच या वैचारिक क्रांतीचे एक प्रवर्तक म्हणून हे विद्यापीठ यापुढे नाणावले गेले पाहिजे. ही अपेक्षा फार कमी आहे असे मला वाटते. एकंदर या विद्यापीठाचा इतिहास आणि मी सांगितल्याप्रमाणे या परिसराचा सामाजिक इतिहास लक्षात घेता, ही किमान अपेक्षा या विद्यापीठाने यापुढे तरी पूर्ण करावी, अशी सदिच्छा मी व्यक्त करतो. आणि मला या महत्प्रसंगी एक प्रमुख पाहुणा म्हणून बोलावून आपण जो माझा सन्मान केला आहे, त्याबद्दल आपणा सर्वांना धन्यवाद देतो आणि भाषण संपवितो.

❑❑❑